॥ या जन्मावर, या जगण्यावर ॥

गायकः अरुण दाते

या जन्मावर, या जगण्यावर,
शतदा प्रेम करावे ॥ धृ. ॥

चंचल वारा, या जलधारा, भिजली काळी माती,
हिरवे हिरवे प्रण तशी ही रुजुन आली पाती।
फुले लाजरी, बघुन कुणाचे, हळवे ओठ स्मरावे,
या जन्मावर, या जगण्यावर, शतदा प्रेम करावे ॥ १ ॥

रंगांचा उघडुनिया पंखा, सांज कुणी ही केली,
काळोखाच्या दारावरती नक्षत्रांच्या वेळी।
सहा ऋतूंचे, सहा सोहळे, येथे भान हरावे,
या जन्मावर, या जगण्यावर, शतदा प्रेम करावे ॥ २ ॥

बाळाच्या चिमण्या ओठातुन, हाक बोबडी येते,
वेलीवरती प्रेम प्रियेचे जन्म फुलांनी घेते।
नदीच्या काठी, सजणासाठी, गाणे गात झुरावे,
या जन्मावर, या जगण्यावर, शतदा प्रेम करावे ॥ ३ ॥

या ओठांनी चुंबुन घेईन, हजारदा ही माती,
अनंत मरणे झेलुन घ्यावी इथल्या जगण्यासाठी।
इथल्या पिंपळपानावरती, अवघे विश्व तरावे,
या जन्मावर, या जगण्यावर, शतदा प्रेम करावे ॥ ४ ॥